# क्विक हीलच्या सीएसआर उपक्रमाने शिक्षण संस्था, शिक्षक व विद्यार्थ्यांना केले सन्मानित



**पुणे :** क्विक हील या जागतिक सायबर सिक्युरिटी सोल्यूशन्स प्रदाता कंपनीने आपल्या सीएआर शाखेच्या माध्यमातून आज त्यांचे 'सायबर सुरक्षेसाठी सायबर शिक्षा अवॉर्ड्स'चे पहिले पर्व आयोजित केले. शिक्षण संस्था, शिक्षक आणि त्यांच्या विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षेविषयी, विशेषत: समाजातील वंचित घटकांमध्ये जागरूकता पसरवलेल्या उल्लेखनीय योगदानासाठी या पुरस्कार सोहळ्यात त्यांचा गौरव करण्यात आला. क्विक हील फाऊंडेशनच्या अध्यक्षा श्रीम. अनुपमा काटकर आणि ६ सहभागी संस्थांमधील शिक्षणतज्ज्ञ यांच्या उपस्थितीत पुणे एडिशनमध्ये पुरस्कार प्रदान करण्यात आले.

पुण्यातील चिंचवड परिसरातील केईएसच्या प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड कम्प्युटर स्टडीजमध्ये हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. शिक्षण संस्थांमध्ये ॲग्रिकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्टचे शारदाबाई पवार महिला महाविद्यालय, डॉ. डी. वाय. पाटील युनिटेक सोसायटीचे डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स, कमला एज्युकेशन सोसायटीचे प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड कम्प्युटर स्टडीज, एमआयटी आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज आळंदी, एमकेएसएसएसचे के. बी. इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नोलॉजी आणि पीडीईएचे अण्णासाहेब मगर कॉलेज यांचा समावेश होता.

शिक्षण संस्था, शिक्षक आणि विद्यार्थी यांना विविध श्रेणींमध्ये पुरस्कार देण्यात आले, ज्यासाठी विजेते त्यांच्या 'सायबर सुरक्षेसाठी सायबर शिक्षा' उपक्रमात सक्रिय सहभाग दर्शवून कृती, उपक्रम आणि प्रसार प्रयत्नांचे वर्णन करणाऱ्या महाविद्यालयांकडून प्राप्त झालेल्या डेटानुसार अंतिम करण्यात आले. क्विक हील फाऊंडेशन वेबसाइटवर एक समर्पित वोटिंग पेज तयार करण्यात आले, जेथे नामांकित कामगिरी व्हिडिओ क्लिप म्हणून पोस्ट केली गेली.

याप्रसंगी बोलताना क्विक हील फाऊंडेशनच्या अध्यक्षा आणि क्विक हील टेक्नोलॉजीज लिमिटेडच्या ऑपरेशनल एक्सलन्सच्या प्रमुख श्रीम. अनुपमा काटकर म्हणाल्या, ''आमचा उद्देश – 'सेक्यूरिंग फ्युचर्स' अनेक व्यक्ती आणि संस्थांच्या सामूहिक प्रयत्नांमुळेच शक्य झाले आहे. आज मी डीएससीआय, महाराष्ट्र सायबर सेल आणि स्थानिक पोलिसांसह आमच्या सर्व भागीदारांना 'सायबर सुरक्षेसाठी सायबर शिक्षा' उपक्रमाला दिलेल्या अमूल्य पाठिंब्याबद्दल मनापासून आभार मानते. आणि अर्थातच, पुण्यातील आमच्या पुरस्कारांच्या पहिल्या पर्वात आम्ही आमचे योद्धे – विद्यार्थी, कार्याचे नेतृत्व करणाऱ्या – शिक्षक आणि शिक्षण संस्था यांनी अधिक अधिक लोकांमध्ये सायबर सुरक्षेबद्दल जागरुकता पसरवण्यासाठी केलेल्या अभूतपूर्व कार्यासाठी त्यांचा सन्मान करतो.''

सत्कार समारंभा ची पुढील चार पर्व अनुक्रमे १५ फेब्रुवारी मुंबई, ३ मार्च रोजी नागपूर, ९ मार्च रोजी सोलापूर आणि १४ मार्च रोजी औरंगाबाद येथे आयोजित केले जातील.

क्विक हील फाऊंडेशन बाबत:

क्विक हील फाऊंडेशन ही जागतिक आघाडीची सायबरसुरक्षा उत्पादने व उपाययोजना कंपनी असलेल्या क्विक हील टेक्नोलॉजीज लिमिटेडची सीएसआर भाग आहे. आम्ही आमच्या 'सिक्युरिंग फ्युचर्स'च्या प्रवासात एक नवीन मार्ग आखण्यासाठी सिक्युरिटीचे सुलभीकरण करण्याच्या दृष्टीने २५ वर्षांच्या अनुभवाचा वापर केला आहे.

कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी क्षेत्रातील आमचे उपक्रम युनायटेड नेशन्स सस्टेनेबल डेव्हलपमेंट गोल्सनी अधोरेखित केलेल्या विकासातील मोठ्या आव्हानांवर काम करतात.